# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६८५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/१०/२०१६

**१) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ११/१०/२०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील फिर्यादी यादवराव रामचंद्र मेश्राम वय ६३ वर्ष, रा. गायडोंगरी यांचा मुलगा शांतदीप याने आपली मोटार सायकल क्र. एमएच ३१ एटी ५२६१ कि. १८,०००/–रु. ची दसरा पाहण्या करीता मोटार सायकल ठेवलेल्या ठिकाणी गेला असता वेळेवर मोटार सायकल नादुरुस्त झाल्याने तेथेच ठेऊन नंतर शेतीचे महत्वाचे काम आल्याने दि. १६/१०/२०१६ ला मोटार सायकल कडे गेला असता ठेवलेल्या ठिकाणी गाडी मिळुन न आल्याने मोटार सायकल चा शोध घेतला असता कोणीतरी अज्ञात चोराने पारस हॉटेल जवळ पवनी येथुन चोरुन नेल्याने आज रोजी पो.स्टे. ला तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**२) जुन्या वादावादावरुन संगनमत करुन मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिली . :–**

दिनांक १७/१०/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन जुन्या वादावरुन भांडण करुन फिर्यादी व तीची मुलगी निता देवनाथ भोवते यांना थापड बुक्यांनी मारुन फिर्यादीचे उजवे हाताच्या मनगटावर आरोपी क्र. १ ने काठीने मारुन जखमी केले व अश्लिल शब्दात शिविगाळ करुन जिवाने मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,२९४,५०६,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोंगाडे पो. स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलगी घरुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १७/१०/२०१६ रोजी ११.०० ते १५.०० वा. दर. यातील फिर्यादी हा आपल्या पत्नीसह शेतीच्या कामाला गेला व काम करुन घरी परत आला असता त्याची अल्पवयीन मुलगी ही घरी दिसुन आली नाही तीचा शोध घेतला असता मिळुन आली नाही तीला अज्ञात व्यक्तीने अपहरण करुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी व मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशान्वये पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीरामे पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**४) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :–**

दिनांक १७/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर व जवाहरनगर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभटटी दारु कि. २,५००/–रू. तसेच जुगारातुन कि. ३१६/–रू. असा एकुण कि. १०,८०६/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.